# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे

दिनांक १२.०२.२०२६

**लोकसेवक संजय पवार, तालुका कृषी अधिकारी, शिरपुर व डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **ला. प्र. विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र.** | शिरपुर शहर पो.स्टे. गुरनं. /२०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दि** | भ्र.प्र. कायदा कलम ७ व १२, प्रमाणे, दि.१२.०२.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | १. सुनिल धनराज पाटील, वय ३१ वर्षे, डाटा इंट्री ऑपरेटर, तालुका कृषी कार्यालय, शिरपुर<br>२. संजय हिम्मतराव पवार, वय ४३ वर्षे, तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, शिरपुर |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ५,०००/— रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत :—</u>** तक्रारदार हे यांचे मौजे बभळाज, ता. शिरपुर येथे शासनमान्य बी बियाणे व खत विक्रीचे दुकान असुन सदर दुकानात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचेकडुन कृषी उन्नती योजना — राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत गव्हाचे प्रमाणित बियाणे वितरीत केले जातात.

तक्रारदार यांनी त्यांच्या दुकानामार्फत महामंडळाकडुन शासकिय अनुदानित गव्हाचे बियाणे खरेदी करुन ते सन २०२५ — २०२६ मध्ये ९० शेतकऱ्यांना गव्हाचे बियाणे शासनाचे अनुदान वजा जाता विक्री केले होते. ९० शेतकऱ्यांना विक्री केलेल्या गव्हाच्या बियाण्यांवरील १,४०,०००/— रुपये शासकिय अनुदान महामंडळाकडुन मिळणेकरीता सदर शेतकऱ्यांची यादी आवश्यक त्या कागदपत्रांसह तक्रारदार हे शिरपुर येथे दि.१०.०२.२०२६ रोजी जमा करण्यास गेले असता तालुका कृषी कार्यालय, शिरपुर येथील डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी कागदपत्र जमा करुन विक्री केलेल्या गव्हाच्या बियाण्यांचे अनुदान मिळणेकरीताची शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांचेसाठी ५,०००/— रुपये द्यावे लागतील असे सांगुन तक्रारदार यांच्याकडे डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दि.११.०२.२०२६ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दि.११.०२.२०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सदर लाच मागणीस तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांनी दुजोरा देवुन अपप्रेरणा दिली. त्यानंतर दि.१२.०२.२०२६ रोजी झालेल्या सापळा कारवाई दरम्यान सुनिल पाटील, डाटा इंट्री ऑपरेटर यांना तक्रारदार यांच्याकडुन ५,०००/— रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात पकडुन सुनिल पाटील, डाटा इंट्री ऑपरेटर व संजय पवार, तालुका कृषी अधिकारी, शिरपुर यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| **पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा अधिकारी** | श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रशांत बागुल, प्रविण पाटील, प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**<u>“लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर”</u>**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :— ७७९८१६१०६४